# प्रशांत ठाकूर यांच्यामुळे पनवेलमध्ये नवचैतन्य; पनवेलच्या विकासाचा महारथ सुरूच राहणार

पनवेल (प्रतिनिधी) मा. आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवडणुक लढविण्याचा निर्णय घेतल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून या निर्णयाने पनवेलच्या विकासाचा महारथ यापुढेही सुरूच राहणार असल्याने पनवेलमध्ये आनंदाला उधाण आले आहे.

लोककल्याण व लोकहित जपत सर्व समाजालासोबत घेवून काम करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर, प्रशांत ठाकूर यांचे राजकीय वजन काय आहे, याची जाणिव सर्वांनाच आहे, महाराष्ट्राच्या राजकारणातील दिग्गज नेते म्हणून त्यांची ओळख तर आहेच, त्याचबरोबरीने समाजाच्या उत्कर्षासाठी सतत प्रयत्नशिल राहणे हा तर त्यांचा दिनक्रम आहे. सामान्यांच्या प्रश्नासाठी उदार मनाने सर्वस्व पणाला लावणारे नेते म्हणून रामशेठ ठाकूर, प्रशांत ठाकूर यांची प्रतिमा वेळोवेळी सिध्द झाली आहे. ज्या गोष्टी लोकहिताच्या आड येतात त्याबाबत संघर्ष केल्याशिवाय पर्याय नसतो. मुख्यमंत्र्यांनी खारघर टोलनाकासंदर्भात घेतलेल्या उदासिन व मौन भुमिकेमुळे टोलचे रणकंदन उठले. दिलेला शब्द प्रमाण मानून स्थानिकांना टोल लागू नये यासाठी सतत प्रयत्न करण्याचे आश्वासन प्रशांत ठाकूर यांनी राजीनामा दिल्यानंतरही बोलवून दाखविला. राजीनाम्यानंतर विरोधकांचा आनंदाला उकळया फुटल्या मात्र त्या काही वेळापर्यंत राहिल्या कारण प्रशांत ठाकूर यांनी जनभावनेचा आदर करून जनहितासाठी निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला त्यामुळे उकळया फुटणाऱ्यांची आनंद आटला असून प्रशांतदादा नावाचे वादळ ज्येष्ठ, युवा, महिला कार्यकर्त्यांच्या तुफान फौजच्या सहाय्याने पुन्हा एकदा वर्चस्व सिध्द करण्यास तयार झाला आहे. विजयाची त्यांना चिंता नाही, विजय नक्की आहे मात्र तो विक्रमी मतांनी झाला पाहिजे, यासाठी सर्व कार्यकर्तेही सरसावले आहेत.

पनवेल मतदार संघात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जिद्दी कार्यकर्त्यांची अचूक फिल्डींग आणि भाजपचे तिकिट या अनुकूल वातावरणामुळे पनवेलमध्ये कमळ फुलणार आहे. भाजपाची देशव्यापी सत्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कणखर नेतृत्व व विश्वासहर्ता या अनुकूल बाबी लक्षात घेवून प्रशांत ठाकूर यांचा भाजपामध्ये सुरू होणारा राजकीय प्रवास पनवेलकरांना उंचीवर नेवून ठेवणार असून पनवेलच्या विकासाचा महामेरू असाच चालू रहात पनवेलला खऱ्या अर्थाने जागतिक दर्जा देण्याचे काम प्रशांत ठाकूर या विकासपुरूषाकडून होणार असल्याने पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.